महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार
यांचे कार्यालय, भुवनेश्वर कॉलनी, कोरीट रोड, नंदुरबार - 425412

e-mail :- ar_nbr@rediffmail.com दुरध्वनी - (02564) 232218

29seen 29605

जाक्र.आस्था फैज नापस/क-83/चौ सन 2016 दिनांक :- **30/12/2016**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) अन्वये आदेश**

**वाचावे :-** 1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 व नियम 1961 चा नियम 72
2) अरुणा ज. शिंदे उपलेखापरिक्षक अधिन जिल्हा विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था वर्ग - 1 नंदुरबार यांच्याकडील जा.क्र. फैज/प्रशाविशेष अह./14-16/244/सन 2016 दि. 09/11/2016 रोजीच्या प्रशासकीय विशेष अहवाल.

---

ज्याअर्थी फैज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत नंदुरबार ता.जि. नंदुरबार (यापुढे जिचा संक्षिप्त उल्लेख उक्त पतसंस्था असा उल्लेख करण्यात आला आहे.) ही पतसंस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 (यापुढे ज्याचा संक्षिप्त उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे.) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 (यापुढे ज्याचा संक्षिप्त उल्लेख उक्त नियम असा करण्यात आला आहे.) अन्वये नोंदणीकृत नागरी पतसंस्था असून तिचा नोंदणी क्रमांक - NBR/NBR/RSR(CR)/19/सन2002-03 व नोंदणी दिनांक - 31/12/2002 असा आहे व उक्त पतसंस्था ही या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 व नियम 1961 व संस्थेने स्विकृत केलेले पोटनियम व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले परिपत्रके, सूचना, निर्देश यांच्या अधिनतेने कामकाज करणे बंधनकारक व अनिवार्य आहे.

आणि ज्याअर्थी वाचावे क्र. 2 मध्ये नमूद केलेल्या उक्त पतसंस्थेच्या दि. 01/04/2014 ते 31/03/2016 या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवालात संस्थेचे सचिव श्री. सैय्यद अजहरमिया सैय्यद मजहरमिया यांनी लेखा परिक्षक यांना लेखा परिक्षणाच्या वेळी वार्षिक सर्वसाधारण सभा व मासिक सभेचे प्रोसेडींग अपूर्ण असल्याचे कारण देऊन तपासणीसाठी प्रोसेडींग सादर केलेले नाही. याचाच अर्थ संस्थेच्या तपासणी मुदतीत संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा व मासिक सभा झालेल्या नाहीत. असे स्पष्ट मत लेखापरीक्षक यांनी सादर लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहे. तसेच 97 घटना दुरुस्तीनुसार संस्थेची दरवर्षी 30 सप्टेंबरपूर्वी सभा घेणे बंधनकारक केलेले आहे. बंधनकारक केलेले असूनही संस्थेने आपल्या सभासदांची वार्षिक सभा बोलविणे आवश्यक होते. परंतु तशी सभा बोलाविल्याचे दिसून येत नाही म्हणजेच संस्थेने पोटनियमातील नियम 32 उल्लंघन केलेले आहे. आणि पोटनियमातील तरतुदीनुसार वार्षिक साधारण सभा मुदतीत न घेणाऱ्या जबाबदार समिती

सदस्यास पाच वर्षासाठी अपात्र आणि जबाबदार व्यवस्थापन अधिकाऱ्यास रु. 5000/- दंडाची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 79 मधील तरतूदीनुसार मधील तरतुदीनुसार विहीत मुदतीत विवरणपत्र तयार करुन सहकार खात्याचे संकेतस्थळावर ऑनलॉईन दाखल केलेले नसल्याने सदर नियमातील तरतुदीचे संस्थेने उल्लंघन केलेले आहे.

तसेच संस्थेचे पोटनियमातील 68 अ नुसार सहकार खातेने वेळोवेळी निर्धारीत केलेली माहिती विहीत नमुन्यात व मुदतीत संस्थेने संबंधीत निबंधकाकडे सादर करणे बंधनकारक असताना ती सादर केलेली नसल्याने सदर नियमांचेही संस्थेने उल्लंघन केलेले आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार माहिती वेळेत सादर करण्यास निष्काळजीपणा /त्रुटी निदर्शनास आल्यास त्यांच्या विरुध्द कायदा/नियम यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याची तरतुद असल्याने या बाबत पुढील कारवाईसाटी विशेष अहवाल सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त वाचावे 2 मधील वैधानिक लेखा परिक्षण अहवालामधील 2 ते 4 मुद्दे नमूद केलेले असून सदर मुद्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) चौकशी करण्याचे नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) मध्ये एखाद्या संस्थेची कलम 81 अन्वये लेखापरिक्षकाने दिलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या आधारे संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने कोणताही भाग घेतला होता, अशा कोणत्या व्यक्तीने किंवा संस्थेच्या कोणत्याही मृत किंवा माजी किंवा विद्यमान अधिकाऱ्याने पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे किंवा त्याने असा पैसा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे. किंवा त्याच्या संबंधात तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे. किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीविरुध किंवा व्यक्तीविरुध्द आरोप ठेवता येईल व संबंधित व्यक्तीस आणि मृत व्यक्तीच्या बाबतीत तिची मालमत्ता ज्याला वारसाने मिळालेली असेल अशा तिच्या प्रतिनिधीस आरोपाबाबत उत्तर देण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निबंधक किंवा त्याने प्रधिकृत केलेली व्यक्ती ठरवेल त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह तो पैसा किंवा ती मालमत्ता किंवा त्या पैशाचे किंवा मालमत्तेचे कोणताही भाग याची परतफेड करण्यास किंवा तो परत करण्यास किंवा असे अपयोजन केल्याबद्दल, ठेवुन घेतल्याबद्दल किंवा अपकार्याबद्दल किंवा विश्वासघात केल्याबद्दल भरपाई म्हणून निबंधक किंवा अशी व्यक्ती ठरविल ती रक्कम संस्थेच्या मत्तेत भरण्याविषयी आदेश देता येईलच अशी तरतूद आहे.

आणि त्याअर्थी उक्त वाचावे 2 मधील वैधानिक लेखा परिक्षण अहवालामधील केलेले कृत्य यामुळे उक्त अधिनियम, उक्त नियम व पतसंस्थेचे उपविधी यातील तरतूदींचे उल्लंघन झाले असून सदर कृतींमुळे उक्त पतसंस्थेचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे प्रथम दर्शनी आढळून येत असल्याची खात्री झाली आहे.

## आदेश

मी एन.बी. चौधरी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नंदुरबार, ता. नंदुरबार मला प्राप्त झालेल्या विधी शक्तीचा वापर करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) मधील तरतूदीनुसार फैज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत नंदुरबार ता.जि. नंदुरबार या पतसंस्थेचे दि.

01/04/2014 ते 31/03/2016 या कालावधीचा प्रशासकीय विशेष अहवाल व उक्त अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यातील गंभीर मुद्याच्या अनुषंगाने या आदेशाचे संलग्न केलेले परिशिष्ट अ मध्ये नमूद बाबींबाबत उक्त कलम 83 (1) व उक्त नियमांचे नियम 72 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी श्री. व्ही. डी. सामुद्रे, प्राधिकृत अधिकारी, फैज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नंदुरबार तथा मुख्य लिपीक अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नंदुरबार तालुका नंदुरबार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टातील बाबींची चौकशी करुन सदर कृतीमुळे पतसंस्थेचे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संस्थेच्या चेअरमन व सचिवावर निश्चित करुन तसा अहवाल तीन महिन्याच्या आंत या कार्यालयास सादर करावा. यासाठी आपणांस सदर चौकशीच्या कार्यवाहीसाठीचा लागणारा मानधन व इतर अनुषांगिक खर्च यासह अलाहिदा मंजूर करण्यात येईल.

सदर आदेश आज दि. 30/12/2016 रोजी माझा सही शिक्का व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

(एन. बी. चौधरी)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था नंदुरबार
ता. जि. नंदुरबार

नंदुरबार
**दिनांक - 30/12/2016**

प्रती,

1) श्री. व्ही. डी. सामुद्रे प्राधिकृत अधिकारी, फैज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नंदुरबार तथा मुख्य लिपीक अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नंदुरबार
2) चेअरमन / सचिव, फैज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नंदुरबार
2/- त्यांना सुचित करण्यात येते की, सदर कार्यवाही कामी प्राधिकृत अधिकारी यांना विधी सुसंगत सर्वतोपरी सहकार्य करावे.

प्रत, माहितीसाठी सविनय सादर

1) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार
2) मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग - 1, सहकारी संस्था, नंदुरबार
3) चेअरमन / मॅनेजर, नंदुरबार सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्यादित शहादा, ता. शहादा

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था नंदुरबार
ता. जि. नंदुरबार